

# श्री. चंद्रलांबा देवी कवच

मराठी अनुवाद

भगवतीस नमस्कार असो. भक्तजनांचे रक्षण करणारीस नमस्कार असो.

महालक्ष्मीस नमस्कार असो. चन्द्रलेस नमस्कार असो. चन्द्रादेवी बंधनविमोचन करणारीस नमस्कार असो. अभंगुरहिंगुलापीठात विहार करणारीस नमस्कार असो. आपल्या तेजाने हनुगुण्ठपदास परीवेष्ठीत करणारीस नमस्कार असो. नारायणमुनीस वर प्रदान करणारीस नमस्कार असो. नवनाथमंडळ रूप धारण करणारीस नमस्कार असो. भ्रमर पंचक उत्पन्न केलेलीस नमस्कार असो. सेतु राजाचा मद पूर्ण रित्या शमन करणारीस नमस्कार असो. भ्रमारीस नमस्कार असो. संसार भ्रमाचा निरास करणारीस नमस्कार असो. काकिनी आणि भीमा नदीच्या संगमतट भूमीचे सेवन करणारीस नमस्कार असो. अभिष्ट वस्तू साठी कल्पवल्लीस नमस्कार असो. सध्योजातादि पंच ब्रह्मात्मकविवरपंचकाद्वारा  व्याप्त पदुकेस नमस्कार असो. परमकारुणिकेस नमस्कार असो.  सुदर्शनानृपास पूर्ण साम्राज्य दान करणारीस नमस्कार असो. मदलसेस  जीवित करणारीस नमस्कार असो. मृकण्डुपुत्रमुनिद्वारा उपासितेस  नमस्कार असो. मार्तण्ड भैरव द्वारा समाराध्येस नमस्कार असो. दत्तात्रेयांस वांछित वस्तू प्रदान केलेलीस नमस्कार असो. हिमाचल आणि दुग्धसमुद्रास तत्वज्ञानाचा उपदेश करणाऱ्या गुरुरुपात विराजमान असलेल्या जगदम्बेस नमस्कार असो.

हे चण्डिके ! तुझा जय असो. हे खण्डचन्द्रशेखरे ! हे भग्नदैत्यसमूहे ! हे भैरवी !  हे विविध शस्त्रांनी मंडीत  भुजांच्या  देवी, भुजदण्डे !   हे सकललोकजननि !  हे सकललोकरक्षीणि  ! हे सकललोकनियमनी   ! तू माझे सर्व बाजूंनी रक्षण कर  रक्षण कर  हे सर्वेश्वरि !  तू माझे  यमराजजन्य भय दूर कर दूर कर. तू माझे रोगसमूह नष्ट कर



# श्री. चंद्रलांबा देवी कवच

नष्ट कर. तू माझ्या शत्रूंना विपत्तीस ने. तू माझी संपत्ती वाढव वाढव. राक्षस, भूत, वेताल, वगैरे प्रचंड उपतापकांना विक्शोभित कर. दस्यु समूहाचे दमन कर दमन कर. त्यांना निःशेष कर निःशेष कर. विष आदिंच्या उपद्रवास अवरुद्ध कर अवरुद्ध कर. पृथ्वीचा अनुचित उपयोग करणाऱ्यांचे छेदन कर छेदन कर. शत्रुकृत अभिचारिक कृत्यांचे कर्तन कर कर्तन कर. दुष्ठ प्राण्यांचे दलन कर दलन कर. माझ्या पापांचा नाश कर नाश कर. रक्षाकर कवचाने मला आवृत कर आवृत कर.

हे महाराज्ञि ! हे महाशक्ति ! तू सर्वस्वरुपा आहेस !

तुला नमस्कार असो ! तुला नमस्कार असो ॥ ३८ ॥

असे हे 'रक्षाकर' नावाचे शुभदायक चन्द्राला कवच मी तुम्हास सांगितले आहे. हे कवच ह्याचे पारायण केले असता सर्वविध सिद्धी देणारे आहे ॥३९ ॥

हे कवच उपासकांच्या सर्व रोगांचा नाश करणारे, त्यांच्या सर्वविध सौभाग्याचे एकमेव निवासस्थान, त्यांच्या सर्व विपत्तीचे शमन करणारे आणि त्यांच्या प्रति होणाऱ्या सर्वविध दृष्ट बाधाँचा नाश करणारे आहे ॥ ४० ॥

जो मनुष्य हे वज्रसदृश कवच भक्तिपूर्वक धारण करितो अर्थात् ह्याचा पाठ व करितो, त्यास युद्धात शस्त्र्घात वगैरेचे भय उत्पन्न होत नाही ॥ ४१ ॥

हे कवच धारण केल्याने सिंह, व्याघ्र, वृक वगैरे हिंस्त्र पशु दुरूनच पळून जातात आणि खाण्यास प्रवृत्त होत नाहीत किंवा हिंसा करीत नाहीत ॥ ४२ ॥



# श्री. चंद्रलांबा देवी कवच

हे कवच धारण करणाऱ्या पुरुषास भूत, प्रेत,पिशाच आदी बघण्यासहि समर्थ होत नाहीत. ह्या कवचाचा तीन वेळ जप करून अभिमंत्रित केलेले भस्म ज्या व्यक्तीस जाते.... ॥ ४३ ॥

त्याचे ग्रहपीडादि उपद्रव क्षणाभरात नष्ट होतात. जो मनुष्य ह्या कवचाने अभिमंत्रित केलेले भस्म .... ॥ ४४ ॥

कपाळावर धारण करितो, सर्व जगत सर्वदा त्याच्या अधीन होते. ह्या मन्त्राने अभिमंत्रित केलेले दुग्धजो मनुष्य ४० X ३ = १२० पितो .... ॥ ४५ ॥

तो मनुष्य मूक असला, तरी गद्य-पद्य-मयी मनोहर वाणी प्राप्त करितो. ह्या कवचाने अभिमन्त्रित केलेले नवनीत (लोणी) अथवा घृत... ॥ ४६ ॥

भक्षण करणारी वांझ असलेली नारी सुद्धा सहा महीन्यातच गर्भवती होते आणि पुत्र सन्तती प्राप्त करिते. ह्या कवचाचा पाठ करणारा उपासक दीर्घ आयुष्य आणि पुत्र - पौत्रादी कुल-वृद्धी प्राप्त करितो ॥ ४७ ॥

एक वर्षपर्यंन्त ह्या कवचाचा पाठ करणारा उपासक अविचल सम्पत्ति प्राप्त करितो. समग्र जीवन (मृत्यु पर्यंत) ह्याचा पाठ करणारा उपासक (चन्द्रला देवीशी एकरूप होते) जीवनान्ती चन्द्रलास्वरूप होतो ॥ ४८ ॥

म्हणून, उपासकाने सूर्य–चन्द्र ग्रहणांच्या वेळी, विषुव संक्रांतिच्या वेळी आणि अयनसंक्रांतिच्या वेळी हे कवच आदरपूर्वक अवश्य वाचावे – म्हणावे ॥ ४९ ॥

एकशे आठ वेळ ह्याची आवृत्ती करणे ह्याचे पुरश्चरण सांगितले गेले आहे. तसे केल्याने हे कवच सिद्ध होते आणि उपासाकाचे सर्व मनोरथ पूर्ण करते ॥ ५० ॥



# श्री. चंद्रलांबा देवी कवच

महालक्ष्मीच्या  आणि चन्द्रलाम्बेच्या पूजेच्या पूर्वी ह्या कवचाचा पाठ करून महालक्ष्मांचे पूजन करावे. असे केल्याने कवचाच्या प्रभावामुळे उपसकाच्या उपासनेत किंवा इतर कर्तव्याकर्मात  विघ्ने येत नाहीत ॥ ५१ ॥

माझ्याद्वारा  आणि इतर सर्व देवांद्वारा सुद्धा हे कवच सतत धारण केले जाते. हे ब्राह्मन् ! तुम्हीही हे कवच धारण करा  (ह्याचा पाठ करीत जा) . असे केल्याने तुम्हास निरन्तर कल्याण प्राप्त होईल ॥ ५२ ॥

॥ श्रीस्कंदपुराणान्तर्गत  श्रीशक्तीरहस्यागत  सह्याद्रिखंडात्  नदीवैभवकाण्डवर्ती श्री सन्नतीक्षेत्र माहात्म्यातील उपासानास्कन्धापासून  ‘कवच कथन’ नावाचा चवथा अध्याय संपूर्ण झाला ॥